1257

क्रमांक :- पोअय/वाचक/अंमलदार कार्यपध्दती/२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 28 APR 2025

**विषय :-** पोलीस अंमलदार यांनी आपले कर्तव्य बजावतांना अनुसरावयाची कार्यपध्दतीबाबत.

--ooo--

उपरोक्त विषयान्वये, पोलीस अंमलदार यांनी आपले दैनंदिन कर्तव्य पार पाडतांना खालील प्रमाणे दिलेल्या सुचना/निर्देशांचे तंतोतंत पालन करणेबाबत सर्व प्रभारी अधिकारी यांनी आपले अधिनस्त पोलीस अंमलदारांना याबाबत दररोज ३ दिवस गणनेत अवगत करावे.

**१. जनतेशी वर्तन :- (Good Behaviour)**

पोलीस अधिकारी/अंमलदारांनी नागरिकांशी सौम्य, आदरपुर्वक व विनम्रतेने वागावे. कोणत्याही परिस्थीतीत राग, व्देष, जाती-धर्मांचा भेदभाव दाखवु नये. भाषेचा संयम राखावा,अपमानास्पद किंवा धमकीवजा शब्द वापरु नयेत.

**२. व्यावसायीकता :- (Professionalism)**

पोलीस अधिकारी/अंमलदारांनी नेमण्यात आलेल्या कर्तव्यावर वेळेवर हजर रहावे. कायदयाचे चौकटीत काम करावे. कोणत्याही चुकीच्या दबावाला बळी पडु नये. प्रशिक्षण व कौशल्यवृध्दीचे कार्यक्रम नियमीतपणे पुर्ण करावे. नागरिकांच्या गोपनियतेचा आदर करावा.

**३. शिस्त :- (Discipline)**

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांचे पालन करावे. डयुटीवर असतांना मोबाईलचा गैरवापर टाळावा. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, भ्रष्टाचार किंवा निष्काळजीपणा टाळावा. रिपोर्टीग, डायरी लेखन व दैनंदिन कामकाज वेळेवर व अचुक ठेवावे.

**४. मोबाईल संवाद व वापर :- (Mobile Communication)**

सरकारी कामासाठी अधिकृत मोबाईल किंवा वॉकी-टॉकीचा वापर करावा. डयुटी दरम्यान वैयक्तिक मोबाईलवर वेळ घालवणे टाळावे. मोबाईलवर संभाषण करतांना गोपनियता व शिष्टाचार पाळावा. नागरिकांशी मोबाईलव्दारे संवाद साधताना सौजन्य, स्पष्टता व तातडीने प्रतिसाद देणे आवश्यक आहे. सोशल मिडीया वापरतांना विभागाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.

**५. जनतेशी संवाद :- (Public Interaction)**

तक्रारदाराची पुर्ण माहिती ऐकुन घ्यावी व योग्य ती मदत करावी. कोणत्याही घटनेच्या वेळी शांतता राखुन योग्य माहिती देणे. नागरिकांमध्ये विश्वास निर्माण होईल अशा पध्दतीने काम करणे.

**६. गणवेष :- (Uniform)**

पोलीस गणवेष नेहमी स्वच्छ व व्यवस्थित ठेवावा. नियमांनुसार गणेवष परिधान करावा. गणवेषात असतांना इतर साहीत्य जसे सोन्या चांदिचे दागिने, धागे-दोरे, कोणतेही धार्मीक प्रतीके, अंगावर (Tattoo) गोदणे, इ. परिधान/वापर करु नये. कोणत्याही छापा/रेड कार्यवाहीमध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गणवेषात कार्यवाही करावी.

**७. व्यवसनाधीनता :- ( addiction )**

कर्तव्यावर असतांना/गणवेषात असतांना कोणीही पोलीस अंमलदार तंबाखु, दारु अथवा इतर अंमली पदार्थाचे व्यसन करणार नाही. तसेच खाजगी जिवनातसुध्दा अशा प्रकारचे व्यसन करणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**८. निष्पक्ष कर्तव्य पार पाडणे :- (Neutral Policing)**

पोलीस अंमलदारांनी आपले दैनंदिन कर्तव्य पार पाडतांना कोणत्याही व्यक्ती, गट, किंवा विचारांवर अन्याय किंवा पक्षपात होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही परिस्थीतीत नेमुन दिलेले कर्तव्य पार पाडत पोलीस अंमलदारांनी तटस्थ/निष्पक्ष भुमीकेत असणे आवश्यक आहे. कायदयाचे चौकटीत राहुन कर्तव्य बजवावे.

Kumar

**( कुमार चिंता )**
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

**प्रति,**

सर्व ठाणेदार यवतमाळ जिल्हा
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ जिल्हा
पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा, यवतमाळ
सर्व शाखा प्रभारी अधिकारी, यवतमाळ जिल्हा

**प्रत उचित कार्यवाहीस्तव :-** अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ.